४) कट्स सुचवून दिलेल्या प्रमाणपत्रानुसार प्रयोग केले जातात की नाही हे पाहण्यासाठी यंत्रणा नसल्यामुळे सारे कट्स धाब्यावर बसवून सर्रास प्रयोग केले जातात. त्यामुळे सेन्सॉर सर्टिफिकेटला प्रयोगात अडथळे निर्माण करणारा एक अर्थशून्य कागद या पलीकडे काही किंमत रहात नाही. मग अशा परिस्थितीत सेन्सॉर बोर्डाची मुळातच आवश्यकता आहे का? कधीकाळी चारपाच वर्षातून एखादी संहिता विवाद्य स्वरुपाची येते. त्यासाठी हजारो संहितांना अर्थशून्य प्रक्रियेत अडकवून उदारमतवादी आणि प्रगत विचारांचं शासन नेमकं काय साधते? सर्व बाजूंनी विचार करता मला असं वाटतं की १) कोणत्याही नाटक अगर एकांकिकेचा प्रयोग करण्यासाठी संहितेला प्रमाणपत्राची पूर्व अट असू नये. २) एखाद्या संहितेविषयी अगर प्रयोगाविषयी वाद उद्भवल्यास आणि त्यासंबंधी लेखी तक्रार आल्यास रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या सर्व सभासदांनी ती संहिता वाचून आणि तो प्रयोग पाहून निर्णय द्यावा ३) खोडसाळ किंवा निरर्थक तक्रार होऊ नये म्हणून अशा तक्रारीसाठी फी असावी. ४) परिनिरीक्षण मंडळात रंगभूमी आणि साहित्य याची जाण असणारे फक्त सात सभासद असावेत. गेली अनेक वर्ष दुर्लक्षित झालेला हा महत्वाचा प्रश्न शासनानं त्वरित पावलं उचलून कायमचा निकालात काढावा अशी माझी मागणी आहे.

समीक्षक आणि रंगकर्मी यांचे परस्परसंबंध हा नाजुक विषय आहे. वास्तविक समीक्षक हा रंगभूमीच्या व्यवहारातला एक महत्वाचा घटक आहे. निदान तो तसा असायला हवा. निर्माते व कलावंत आणि समीक्षक ह्यांच्यातला दुरावा, एकमेकांविषयी अढी ही रंगभूमीला उपकारक नाही. ही अढी कशामुळे? तर निर्माते आणि कलावंत ह्यांच्या मते १) समीक्षकांची मतं ही पूर्वग्रहदूषित असतात २) समीक्षकांना पुरेसं ज्ञान नसतं ३) आपल्या उपद्रव मूल्याविषयी त्यांना अभिमान असतो. तर समीक्षकांच्या म्हणण्याप्रमाणे हे सारे आक्षेप फक्त वाईट परीक्षण आलं की घेतले जातात. आपण कुणाचं बरोबर कुणाचं चूक याची चर्चा न करता या विषयाकडे बघूया. मुळात रंगकर्मींनी सर्वच समीक्षकांची मतं पूर्वग्रहदूषित असतात ही भावना मनातून काढून टाकावी. समीक्षकांची मतं ही त्यांची व्यक्तिगत, प्रामाणिक मतं आहेत हे आपण मानलं पाहिजे. त्यांच्या मतांना प्रातिनिधिक समजायचं कारण नाही. समीक्षकांना रंगभूमीच्या सर्व अंगांचं पुरेसं ज्ञान असावं ही अपेक्षा वाजवी आहे. पुरेसं ज्ञान नसलं की परीक्षणात "नेपथ्य देखणं होतं, प्रकाश योजना पोषक होती, पार्श्वसंगीत सुयोग्य होतं," अशी भोंगळ विधानं येतात. समीक्षकांना सर्व